# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१९७ दिनांक -२४/०५/२०२४

## अनोळखी मयत याच्या खुनाचे रहस्य उलगडण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १०/०५/२०२४ रोजी १८:०० वा. च्या सुमारास,मुंबई अहमदाबाद महामार्ग, मुंबई वाहिनी लगत, सोपारा फाटा, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर येथे रस्त्यावरील एका नाल्यात एक पुरुषाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळुन आला होता. सदर मृतदेहाची ओळख पटत नसल्याने पेल्हार पोलीसांनी बेवारस अकस्मात मृत्यु रजि. क्रमांक ६५/२०२४ सीआरपीसी १७४ अन्वये दाखल करुन तपासाची सुरुवात केली.

सदर अकस्मात मृत्युचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी सदर अकस्मात मृत्यु मधील मयताची ओळख पटवुन त्यांची सखोल चौकशी करण्याचे आदेश कुमारगौरव धादवड, पो.नि (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री. सोपान पाटील, पोउपनि भोपळे व टीमला योग्य त्या सुचना देऊन मार्गदर्शन केले.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कुमारगौरव धादवड, पो.नि (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे श्री. सोपान पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, पोउपनिरी/तुकाराम भोपळे व गुन्हे प्रकटीकरण पथकाने अकस्मात मृत्युची चौकशी सुरु केली होती. सदर अकस्मात मृत्युच्या चौकशीमध्ये मयताच्या पॅन्टमध्ये एक चिठ्ठी भेटली सदर चिठ्ठीवर ESEL असे नाव असल्याने सदर नाव गुगलवर टाकुन शोध घेतला असता गुगलवर विविध प्रकारच्या वेबसाईट दुकानांचे नावे असे आले असता सदर नावावरुन मोबाईल नंबर १०० ते १५० लोकांशी संपर्क केला असता ESEL स्टुडीओ ट्रॉम्बे मानखुर्द, नवी मुंबई येथे शुटींगचे जुनिअर आर्टीस्ट पुरविण्याचे काम करणारा संतोषकुमार यादव हा दिनांक ०७/०५/२०२४ रोजी पासुन बेपत्ता असुन त्याचा फोन लागत नसल्याचे समजले. त्यावरुन मिळालेल्या माहीतीवरुन संतोषकुमार यादव याच्या नातेवाईकांना बोलावुन त्यांना मिळुन आलेला कुजलेला मृतदेह दाखविला असता मृतदेहाची ओळख संतोषकुमार यादव हा असल्याची झाली. संतोषकुमार यादव यांच्या शवविच्छेदन अहवालामध्ये त्याच्या मृत्युचे कारण हे “हेड एन्जुरी” असे आल्याने पेल्हार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी पोउपनि संभाजी मुंडे यांना सरकारतर्फे फिर्याद देण्यास सांगुन पेल्हार पोलीस ठाणे गु.र.क्रं.ा ४७०/२०२१ भादविसं कलम ३०२,२०१ प्रमाणे दिनांक १३/०५/२०२४ रोजी गुन्हा दाखल केला.

सदर गुन्हयाच्या तपासात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळालेल्या तांत्रिक व गुप्त बातमीदाराच्या माहीतीच्या आधारे यातील मयत संतोषकुमार यादव यास शुटींग लाईनमध्ये जुनिअर आर्टीस्ट लेबर कॉन्ट्रक्ट मिळाला असुन त्याचे मित्र सनी सुनिल सिंग, वय- २६ वर्षे, व राहुल सोहन पाल हे देखील शुटींग लाईनमध्ये जुनिअर आर्टीस्ट लेबर पुरविण्याचे काम करीत होते. सदरचा कॉन्ट्रक्ट मयत संतोषकुमार यादव मिळाला असल्याने त्याचा राग धरुन मित्र सनी सुनिल सिंग, वय- २६ वर्षे, व राहुल सोहन पाल यांनी पार्टीचे नियोजन करुन त्यास दिनांक ०७/०५/२०२४ रोजी नालासोपारा येथे भेटण्यास बोलावुन त्यास दारु पाजुन सोपाराफाटा ब्रिजच्या पुढे वसई बाजुला नाल्याजवळ खाली घेवुन जावुन त्याच्या डोक्यास दगडाने ठेचुन जिवे ठार मारले असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने आरोपीत सनी सुनिल सिंग हा परराज्यात पळुन जात असतांना त्यास ठाणे येथुन दिनांक १४/०५/२०२४ रोजी ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. कुमारगौरव धादवड हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकिल शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, अशोक परजने, पो.अं./रवि वानखेडे, अभिजीत नेवारे, मिथुन मोहिते, संजय मासाळ, किरण आव्हाड, राहुल कर्पे, निखील मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, सर्व नेमणुक पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**